# प्रेसनोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २५/०४/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) श्रीमती संगिता फ्रान्सिस धनवटे, वय ४२ वर्षे, पद मुख्याध्यापिका (श्रेणी–२), हॉली क्रॉस हिंदी प्रायमरी शाळा, बडनेरा, राह. टिचर क्वॉटर्स, हॉली क्रॉस हिंदी प्रायमरी शाळा, बडनेरा, जि. अमरावती.<br>२) सौ. अश्विनी विजय देवतार, वय ३७ वर्षे, पद सहाय्यक शिक्षक (श्रेणी–३), हॉली क्रॉस हिंदी प्रायमरी शाळा, बडनेरा, राह. भुमीपुत कॉलनी, कॉग्रेस नगर रोड, अमरावती. |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दिनांक २५/०२/२०२५ रोजी १०.१८ ते १०.३० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ७५०/–रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | ७५०/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ७५०/–रुपये |
| ७ | घटनास्थळ | हॉली क्रॉस हिंदी प्रायमरी शाळा, बडनेरा येथील मुख्याध्यापिके च्या कॅबिनमध्ये |

**थोडक्यात हकिगत** :– यातील तक्रारदार यांचा मुलगा हॉली क्रॉस प्रायमरी हिंदी शाळा, बडनेरा येथील इयत्ता ३ री, तुकडी ब या वर्गात शिक्षण घेत असुन सदरची शाळा ही खाजगी अनुदानित असुन शाळेस शासनाकडुन १०० टक्के अनुदान मिळत असतानाही तक्रारदार यांचे मुलाचे शिक्षणाची वार्षिक फि चे १५५०/–रू. पैकी ८००/–रू. तक्रारदार यांनी यापूर्वी दिलेले असुन उर्वरित ७५०/– रू. देण्याबाबत संबंधीत शाळेतील तक्रारदार यांचे मुलगा शिकत असलेल्या शाळेच्या वर्गशिक्षिका व मुख्याध्यापिका मुलास वारंवार उर्वरित फि ची मागणी करीत होते. परंतु तक्रारदार यांना सदरची नियमबाहय फि देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २२/०४/२०२५ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक २३/०४/२०२५ रोजीचे पडताळणीमध्ये वर्गशिक्षिका सौ. अश्विनी देवतार यांनी तक्रारदार यांना शाळेची नियमबाहय फि देण्याकरीता प्रोत्साहीत केले व दिनांक २५/०४/२०२५ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान त्यातील नमुद मुख्याध्यापिका श्रीमती संगिता धनवटे यांनी फिचे ७५०/–रू आणुन दया, असे म्हणून शाळेची नियमबाहय फि म्हणून लाच रक्कम स्विकारण्याची समंती दर्शविली.

दिनांक २५/०४/२०२५ रोजी पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्रीमती संगिता धनवटे यांनी हॉली क्रॉस हिंदी प्रायमरी शाळा, बडनेरा या शाळेस शासनाकडुन १०० टक्के अनुदान मिळत असतानाही तक्रारदार यांचेकडुन शाळेची नियमबाहय फि ७५०/–रू. स्विकारताना लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहेत. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. बडनेरा, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. भारत जाधव, तसेच पो.नि. केतन मांजरे, पोलीस अमलदार उपेंद्र थोरात, वैभव जायले, शैलेश कडु, चित्रा वानखेडे व चालक पोहवा राजेश बहिरट यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,टोल फ्रि नंबर–१०६४**

**(भारत एकनाथ जाधव)**
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.
मो.न. ८१०८५५८८१२.